# 'आशा' प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शिका

डॉ. मोहन देशपांडे




साथी प्रकाशन



# ‘आशा’ प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शिका

लेखन

**डॉ. मोहन देशपांडे**

संपादन

**डॉ. अनंत फडके**

**साथी प्रकाशन**

# अनुक्रमणिका


- प्रस्तावना ........ ३-४
- शिक्षण, प्रशिक्षण, प्रौढांचे शिक्षण ........ ५-१०
- संवादी, सहभागी प्रशिक्षण ........ ११-१५
- 'आशा' प्रशिक्षणाची तयारी ........ १६-१८
- 'आशा' प्रशिक्षण शिबिर – १ ........ १९-९२
- 'आशा' प्रशिक्षण शिबिर – २ ........ ९३-१२४
- 'आशा' प्रशिक्षण शिबिर – ३ ........ १२५-१४४
- 'आशा' प्रशिक्षण शिबिर – ४ ........ १४५-१७०
- 'आशा' प्रशिक्षण शिबिर – ५ ........ १७१-२०५

# प्रस्तावना

‘आशां’चे प्रशिक्षण करण्यासाठी प्रशिक्षकांना मदतकारक अशी ही डॉ. मोहन देशपांडे लिखित मार्गदर्शिका प्रशिक्षकांच्या हातात ठेवताना आम्हाला आंनद होतो आहे. ‘साथी’ने आशांच्या प्रशिक्षणासाठी बनवलेले चित्ररूप प्रशिक्षण पूरक पुस्तके शिकवायला मदत व्हावी म्हणून ही मार्गदर्शिका बनवली आहे. त्यामागची पार्श्वभूमी थोडक्यात पाहूया.

ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य सेवेत भरीव सुधारणा व्हावी या हेतूने केंद्र सरकारने ‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’ एप्रिल २००५ पासून सुरू केले. या अभियानामार्फत केल्या जाणाऱ्या सुधारणांपैकी एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे ग्रामीण भागात दर हजार लोकसंख्येमागे एक याप्रमाणे आठ लाख ‘आशां’ची भारतभर नेमणूक. प्रत्येक गावात अशी प्रशिक्षित कार्यकर्ती हवी अशी आरोग्य चळवळीची खूप वर्षांपासून मागणी होती. निरनिराळ्या ग्रामीण आरोग्य संघटनांनी अशा कार्यकर्त्या प्रशिक्षित करून त्यांच्यामार्फत ग्रामवासियांपर्यंत प्राथमिक आरोग्य-सेवा पोचण्याचे अनेक यशस्वी प्रयोग केले होते. सरकारने नेमलेल्या ‘आशां’ना नेमून दिलेली भूमिका त्या मानाने मर्यादित असली, त्यांचा अभ्यासक्रम, त्यांना दिला जाणारा मोबदला या याबाबत ‘साथी’ची व आरोग्य चळवळीची काही वेगळी मते असली तरी आशांची नेमणूक हे एक पुढे जाणारे पाऊल आहे व म्हणून ‘साथी’ने यथाशक्ती या ‘आशा’ कार्यक्रमात योगदान द्यायचे ठरवले.

विशेषतः कमी शिकलेल्या ग्रामीण स्त्रियांना आरोग्य-कार्यकर्ती म्हणून प्रशिक्षण देण्याचे काम ‘साथी टीम’ १९९८ पासून करत आहे. त्यांच्यासाठी ‘साथी’ने चित्ररूप प्रशिक्षण पुस्तके तयार केली आहेत. ‘आशा’ म्हणून निवड झालेल्या विशेषतः आदिवासी भागातील स्त्रियांपैकी अनेकींचे पाचवी- सातवी पर्यंतच शिक्षण झाले आहे. महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य-खात्याने बनवलेली आशांसाठीची प्रशिक्षण पुस्तके या कमी शिकलेल्या ‘आशां’ना अवघड वाटतील म्हणून या कमी शिकलेल्या ‘आशां’साठी खास चित्ररूप अशी पाच प्रशिक्षण पुस्तके ‘साथी’ने बनवली. महाराष्ट्रातील ‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’चे संचालक श्री. मधुकर चौधरी, सहसंचालक डॉ. सतीश पवार व इतर संबंधित अधिकाऱ्यांना ती खूप आवडली. म्हणून आदिवासी भागातील सर्व ९००० ‘आशा’साठी ही पाचही पुस्तके ‘अभियाना’ तर्फे प्रसिद्ध करण्यात आली.

दुसरे म्हणजे खोज संस्था व अपेक्षा होमिओ सोसायटी (अमरावती), जनार्थ आदिवासी विकास संस्था व लोकसमन्वय प्रतिष्ठान (नंदूरबार), आम्ही आमच्या आरोग्यासाठी (गडचिरोली), बायफ (ठाणे), वचन (नाशिक) या समविचारी संस्था आरोग्य-कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करत आल्या आहेत. या संस्था व ‘साथी’ यांनी मिळून या पाच ‘आदिवासी जिल्ह्या’तील प्रत्येकी ५० आशांचे प्रशिक्षण केले त्यासाठी ‘साथी’ने बनवलेल्या या पाच ‘पूरक प्रशिक्षण’ पुस्तिका वापरल्या. एकूण २५० आशांचे प्रशिक्षण करायचा एक छोटा प्रकल्प या संस्थांनी ‘अभियाना’ अंतर्गत २००८-२००९ मध्ये यशस्वीपणे पार पडला. या प्रकल्पामध्ये ‘आरोग्याचे भान’चे डॉ. मोहन देशपांडे आणि ‘फाउंडेशन फॉर रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ’ (FRCH) यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या पाच जिल्ह्यातील संस्थाच्या प्रशिक्षकांना हे ‘पूरक प्रशिक्षण पुस्तिके’ शिकवण्यासाठी उपयोगी पडतील अशा छोट्या मार्गदर्शिका डॉ. मोहन देशपांडे यांनी बनवल्या. त्या या प्रशिक्षकांना खूपच उपयोगी पडल्या. प्रस्तुत पुस्तक म्हणजे या मार्गदर्शिकांची एकत्र, बरीच वाढीव व सुधारित आवृत्ती आहे.

ग्रामीण, शहरी स्त्रियांचे संवादी व संवदेनशील पद्धतीने आरोग्य-कार्यकर्ती म्हणून प्रशिक्षण करण्यात तसेच प्रशिक्षकांचे प्रशिक्षण करण्यात डॉ. मोहन देशपांडे हे महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध आहेत. वर निर्देशिलेल्या प्रकल्पातील प्रशिक्षकांना तसेच 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना'तील आशांच्या 'मास्टर ट्रेनर्स'ना प्रशिक्षण देण्यातील त्यांच्या अनुभवाचा आधारे त्यांनी हे पुस्तक लिहले आहे. ते सर्व संबंधितांना निश्चित आवडेल याची आम्हाला खात्री आहे.

प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षक व शिबिरार्थी दोघेही शिकत असतात! प्रत्येक प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षक स्वतःही अधिकाधिक शिकत जातो. त्यासाठी प्रस्तुत मार्गदर्शिका म्हणजे एक मदतकारक साधन आहे. ते जितके वापरले जाईल तितके ते प्रशिक्षकाच्या हातातल रुळेल, त्याचे मोल लक्षात येईल, प्रशिक्षणाची प्रक्रिया सुधारत जाईल. तसेच 'आशां'च्या दृष्टीनेही प्रशिक्षण शिबिर ही एक नुसती सुरुवात आहे. प्रशिक्षण घेतल्यावर समाजात जाऊन प्रत्यक्ष जेवढे काम त्या करतील तेवढ्या त्यांच्या 'आशा' म्हणून क्षमता आकाराला येतील.

'आशा'ने लोकांशी संवाद साधणे, लोकांसोबत आरोग्याचे काम करणे, लोकांच्या आरोग्य हक्काबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करणे यासाठी आशांना केवळ आरोग्याबाबतचे धडे शिकवणे पुरेसे नाही. गावातील सामान्य स्त्रीने आत्मविश्वासाने उभे राहून गावात 'आशा' म्हणून काम करणे, गावकऱ्यांशी संवाद साधणे हे कसे करायचे याबाबत म्हणजे 'आरोग्य-संवाद'बाबत आशांचे थोडेसे पद्धतशीर प्रशिक्षण व्हायला हवे. 'आशा' साठीच्या सध्याच्या अभ्यासक्रमात त्याला फारसे स्थान नाही. त्यामुळे 'आशा पूरक प्रशिक्षण-पुस्तक' व प्रस्तुत मार्गदर्शिका यामध्ये या विषयाला पुरेसा न्याय द्यायला वाव नव्हता. तरी डॉ. मोहन देशपांडे यांनी जागोजागी 'संवाद', संवेदनशीलता याबाबत काही सूचना दिल्या आहेत. त्यांचा प्रशिक्षकांनी जरूर उपयोग करावा.

ही मार्गदर्शिका आकाराला येण्यासाठी अनेकांचा हातभार लागला आहे. डॉ. मोहन देशपांडे यांनी परिश्रम घेऊन ही मार्गदर्शिका लिहिली, मार्गदर्शिकेच्या मसुद्याबाबत आमच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चांनंतर मसुद्यांमध्ये सुयोग्य बदल केले, तसेच आमचे 'संपादकीय आक्रमण' सहन केले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. 'आशा प्रशिक्षण प्रकल्पातील' वर निर्देशिलेल्या आमच्या सहयोगी संस्था, त्यांचे 'आशा-प्रशिक्षक' यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार. 'साथी'च्या भाग्यश्री खैरे, शारदा महल्ले, शकुंतला भालेराव यांनी खास आवडीने पानांची रचना आणि मांडणी केली; रवि मांडेकर, गजानन लोंढे, जेसी जेकब यांनी आत्मीयतेने संगणकीय अक्षर जुळणी केली; शारदा महल्ले यांनी एकूण पुस्तकाची संगणकावर जुळवणी केली; भाग्यश्री खैरे यांनी नियोजनाचा भाग सांभाळला, संपादनाच्या कामात मदत केली, या बद्दल त्यांचे आभार. एन. आर. एंटरप्राइजेस यांनी वेळेवर, सुबक छपाई करून दिली याबद्दल त्यांचे आभार. 'ऑक्सफॅम इंडिया'ने दिलेल्या आर्थिक योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

'आशा पूरक प्रशिक्षण पुस्तिकां'च्या मदतीने आशांचे प्रशिक्षण करणाऱ्या प्रशिक्षकांना ही मार्गदर्शिका आवडेल असा विश्वास वाटतो. दुसऱ्या आवृत्तीसाठी केलेल्या सूचना आम्ही आनंदाने स्वीकारू.

डॉ. अनंत फडके                                        डॉ. अभय शुक्ला

८ मार्च, २०११
आंतरराष्ट्रीय महिला दिवस

# ‘आशा’ प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शिका

आशांचे प्रशिक्षण करण्यासाठी प्रशिक्षकांसाठी ही मार्गदर्शिका आहे. ‘आशा पूरक प्रशिक्षण पुस्तिका’ या पाच चित्ररूप प्रशिक्षण पुस्तिकांच्या आधारे आशांचे प्रशिक्षण करणाऱ्या प्रशिक्षकांसाठी ठोस मार्गदर्शन या मार्गदर्शिकेमध्ये आहे.

शाळेतील मुलांना शिकवणे व ‘आशां’ना शिकवणे यात काय महत्त्वाचा फरक आहे; प्रशिक्षण व शिक्षण यात काय फरक आहे; या प्रशिक्षणासाठी तयारी काय करावी; सुरुवात कशी करावी; कोणते बारकावे, पथ्ये लक्षात ठेवावी; प्रशिक्षणार्थी स्त्रियांचा आत्मविश्वास कसा जागृत करावा; त्यांच्यात प्रशिक्षणाबद्दल आवड कशी निर्माण होईल अशा ‘आशा’च्या प्रशिक्षणाच्या सर्व पैलूंबाबत या पुस्तकात मार्गदर्शन केले आहे.

धड्याची ‘प्रशिक्षण उद्दिष्टे’ कोणती हे प्रत्येक धड्याच्या सुरुवातीला मांडून ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्या त्या धड्याबाबतच्या प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन केले आहे. असे करतांना संबंधित विषयाबाबत गरज असेल तिथे काही शास्त्रीय माहिती दिली आहे व जागोजाग वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना दिली आहे.

‘संवादी’ पद्धतीने प्रशिक्षण करण्यात प्रसिद्ध असलेल्या डॉ. मोहन देशपांडे यांची ही मार्गदर्शिका आशा प्रशिक्षकांना आवडावी; बहुमोल ठरावी.

देणगी मूल्यः रु. २००/-

साथी प्रकाशन

(अर्थसहाय्य)

ऑक्सफैम इंडिया Oxfam India